## कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जि.प. कोल्हापूर यांचे कार्यालय

पत्र
प्रति,
मा. उपवनसंरक्षक
कोल्हापूर वन विभाग, कोल्हापूर

जा.क्र.- कोजिप/ग्रापापुवि/कावि-८/ ११९२ / २०-२१
कोल्हापूर, दिनांक- ८/१०/२०२०

**विषय :- वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत प्रस्ताव**

मौजे-वेखंडवाडी ता. पन्हाळा जि. कोल्हापूर येथील पिण्याच्या पाण्याचा पुरवठा योजनेचा प्रस्ताव केंद्र शासनास सादर करणेकामी विहीत नमुन्यातील प्रस्ताव सादर करणे बाबत.

**संदर्भ** :- १) या कार्यालयाचे पत्र क्रमांक- कोजिप/ग्रापापुवि/कावि-८/३८०/२०-०२-२०

२) आपले कडील पत्र क्रमांक- ब/वनसंवर्धन/५२/ दिनांक- १६-०४-२०

वरील संदर्भीय पत्र क्रमांक- १ अन्वये विषयांकीत बाबतचा ०.१६५५ हे.आर वनक्षेत्र मागणीचा प्रस्ताव आपले कार्यालयास सादर करण्यात आला होता. त्यावर वरील संदर्भीय पत्र क्रमांक -२ अन्वये आपले कार्यालयाकडून १ ते ९ त्रुटी उपस्थित केल्या होत्या त्याची पुर्तता करून पुर्ततेसह विहीत प्रपत्रात १ ते ६ प्रतीत प्रस्ताव या सोबत आपले कार्यालयास सादर करण्यात येत आहे.

मौजे वेखंडवाडी गावाच्या पिण्याच्या पाण्याच्या पाईप लाईन साठी बादेवाडी ता. पन्हाळा गावातील वनगट क्रमांक-१८५, १८६ मधील ०.१६५५ हे.आर क्षेत्र प्रस्तावीत केलेले आहे. वेखंडवाडी हे गाव बादेवाडी या गावातच समाविष्ट होते परंतु नंतर बादेवाडी व वेखंडवाडी या दोन ग्रामपंचायती वेगवेगळ्या झाल्या होत्या परंतु महसुल दफ्तरी ७/१२ उतारा मध्ये बादेवाडी या गावाचे नावच आज अखेर आहे त्यामुळे सदर प्रस्तावात बादेवाडी गावाचेच ७/१२ समाविष्ट केलेले आहे.

सदर प्रस्ताव हा वेखंडवाडी ग्रामस्थांच्या पिण्याचा पाण्याचा आहे त्यामुळे त्यांची निकड व महत्त्व लक्षात घेऊन सदरचा प्रस्ताव लवकरात लवकर आपल्या आभिप्रायासह वरिष्ट कार्यालया मार्फत नागपूर कार्यालयास सादर करावा ह विनंती.

सोबत:- वरील प्रमाणे ६ प्रतीत प्रस्ताव आणि त्रुटी पुर्तता अहवाल.

(एम.बी. पवार)
कार्यकारी अभियंता
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग
जिल्हा परिषद कोल्हापूर

प्रत:- १) उप अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग जि.प. कोल्हापूर यांना माहितीसाठी आणि वनविभागाशी संपर्क साधून पाठपुरावा करणेसाठी रवाना.

२) सरपंच, ग्रामपंचायत वेखंडवाडी ता. पन्हाळा जि. कोल्हापूर यांना माहीतीसाठी.

आवक / जावक लिपीक
उप वनसंरक्षक,
कोल्हापूर वन विभाग, कोल्हापूर.